म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य निबंध
सं. क्र. १००८
रज १०५८



# भुलायांचा उत्सव अभिनय गीतें



REFBK-0010604
REFBK-0010604

संपादिका
सौ. सुशीला दा

लहान मुलींसाठी नवीन स्वरुपांत

# मुलायांचा उत्सव व साभिनय गीतें

: संपादिका :

सौ. सुशिला दाणी, बुलढाणा.

–सहसंपादिका–

कुमारी कमल धावडे, नागपूर.

: प्रकाशिका :

सौ. शकुन्तलाबाई पडोळे

## पूजा प्रकाशन, धंतोली, नागपूर.

...ब्रुवारी १९५८.

मुल्य ३१ नये पैसे.

REFBK-0010604
REFBK-0010604
५४५६७ काव्य
९२१३१०७१
मराठी ग्रंथ संग्रहालय
नागपूर १.

: संचालक :
डॉ. ल. वा. पडोळे,
पूजा प्रकाशन,
धंतोली, नागपूर.

सर्व हक्क प्रकाशिकेच्या स्वाधीन.

: मुद्रक :
ताकवाले प्रिंटींग प्रेस,
नेताजी मार्केट, नागपूर.

# संपादकीय निवेदन

"भुलायांचा उत्सव व साभिनय गीतें" हें पुस्तक सान बालिका व प्रौढ भगिनींचे हातीं देतांना मला आनंद होत आहे. अशा तऱ्हेचें पुस्तक छापून भगिनींना सादर करण्याचा बरेंच दिवसाचा मानस होता. श्री गजाननाची कृपा म्हणूनच हें कार्य हातून पुरें होत आहे. याचें बरेचसे श्रेय सौ. शकुंतलाबाई पडोळे यांना आहे कारण 'भुलायांचें हें स्वरुप बदललें पाहिजे' हा तरुण-भारत मधील माझा लेख वाचून त्यावर अनेक भगिनी कडून चर्चात्मक लिखाण आलें व तें वाचून सौ. शकुंतलाबाईंनी भुलायांचा हा उत्सव कसा साजरा करावा याबद्दल लिखाण मागविलें व आपल्या 'पूजा प्रकाशनातर्फे' तें पुस्तक रुपानें छापण्याचें आश्वासन दिलें. त्याप्रमाणें लिखाण आलें व सौ. शकुंतलाबाईंच्या कल्पनेला मूर्त स्वरुप येऊन आज हें पुस्तक छापलें जात आहे. समाज जागृतिकरता व मुलींच्या भावी जीवनाला योग्य वळण लागावें याकरतां सौ. पडोळे यांनी जी आस्थापूर्वक कामगिरी केली त्याबद्दल त्या धन्य-वादास पात्र आहेत.

भुलायांचा सण अभिनव पद्धतीने कसा साजरा करावा याबद्दल या पुस्तकांत विवेचन केलें आहे. त्याप्रमाणें हा सण सर्वत्र साजरा व्हावा व मुलींच्या बौद्धीक व शारिरीक विकासांकडे सर्व भगिनींनी लक्ष द्यावें असा मूळ उद्देश पुस्तक छापण्याचा आहे. नव्या गाण्यांची संवय व्हायला १-२ वर्षे मेहनत घ्यावी लागेल इतकेच. आणखीही नवीं नवीं गाणी आपापल्या गांवांत बसविल्यास उत्तम होईल. हें कार्य भगिनी मंडळें व

तत्सम अन्य स्त्री-संस्थांनी हातीं घेतल्यास संस्थेचाही नांव-लौकीक वाढेल व समाजकार्याचेंहि पुण्य पदरीं पडेल.

ज्या भगिनींनी गीतें पाठविलीं त्या साऱ्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतें. तसेंच ज्यांनीं लेख पाठवून निरनिराळच्या सूचना केल्या त्यांचेही आभार मानतें हें व अशीं अनेक कार्यें करीत असतांना ज्यांची सहानुभूती नी अनुमती मला सदैव मिळते. त्या माझ्या पतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें माझें कर्तव्य आहे. त्यांची अनुमती वा संमती असल्यामुळेंच हें कार्य करण्यास लागणारी मनःशांती मला लाभते याशिवाय कु. कमल धावडे यांनीही संपादिकेचें सहकार्य दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून व ही अभिनव पद्धती रुढ व्हावी व मुलींच्या जीवनाला चांगलें वळण लागावें अशी सदीच्छा व प्रभूपदीं प्रार्थना करून लेखणी खाली ठेवतें.

सौ. सुशीला दाणी, बुलढाणा.

# प्रकाशिकेंचे दोन शब्द

आज "भुलायांचा उत्सवाचें" हें पुस्तक प्रसिद्ध करतांना मला विशेष आनंद होत आहे. समाजांतील एक स्त्री घटक या नात्याने माझ्यावर समाजाचें नैतिक ऋण आहे. व जबाबदारीहि आहे. ती जबाबदारी व तें ऋण अल्पांशाने कां होईना मी फेडण्याचा चिमुकला प्रयत्न करीत आहे. ह्या प्रयत्नाला माझ्या महाराष्ट्रीयन भगिनी व मुली सक्रिय सहकार्य देऊन मला उत्साहित करतील अशी आशा आहे.

'भुलायांचा सण कसा साजरा करावा ?' या विषयाला बुलढाण्याच्या माझ्या सुविद्य भगिनी सौ. सूशिलाबाई दाणी यांनी नोव्हेंबर १९५६ मध्ये तरुण भारतांतील 'महिलांचें मनोगत' या सदरांत लेख लिहून चालना दिली. या विषयावर पुढे तरूण भारतांतून बरीच उलट सुलट चर्चा झाली, कांही सूचना आल्यात आणि त्या सर्वांचा विचार करूनच आज हें पुस्तक मी जनता जनार्दनापुढें ठेवतें आहे.

आज समाजांत अशा कितीतरी चालीरीति, सण व रूढी आहेत की, ज्या विकृत रूपानेच जास्त फोफावत आहेत, साजऱ्या केल्या जात आहेत. व हेंच संस्कार बालमनावर बिंबून पुढे त्याचें परिणाम वाईट निघतात. तेव्हां आजच्या स्वतंत्र भारतांत बदलत्या परिस्थितिप्रमाणें त्यांची पुनर्रचना करणे अत्यावश्यक व अगत्याचें झालें आहे. समाजसुधारकांनी व महिला कार्यकर्त्यांनी या गोष्टीकड़े ताबडतोब लक्ष देऊन ही समाजवृक्षाला लागलेली कीड मारून टाकली पाहिजे व

आधुनिक काळाला व आर्थिक परिस्थितीला झेपतील, रूचतील व पचतील अशी रचना केली पाहिजे.

हें पुस्तक लिहितांना सौ. सुशिलाबाई दाणी व त्यांच्या सहाय्यक संपादिका कु. कमल धावडे यांनी आपुलकीने मेहनत घेऊन हें पुस्तक जसें संपादिलें आहे, तसेंच या पुस्तकाकरितां आपली गीतें देऊन सौ. उषा लिमये, सौ. तारा सावंगीकर, सौ. इंदुमती देशपांडे, कु. गंगुताई लामट. शकुंतला मंगरूळकर आदि भगिनींनी अनमोल सहकार्य दिलें आहे याबद्दल मी या भगिनीचें हार्दिक आभार मानतें.

तसेंच पुस्तक सर्वांग सुंदर व्हावें म्हणून पूजा प्रकाशनाचें संचालक डॉ. ल. वा. पडोळे, यांनी जी काळजी व मेहनत घेतली त्याबद्दल आणि ह्या पुस्तकावरील आकर्षक कव्हर तयार करणारे आर्टिस्ट श्री. मनोहर व पुस्तकाची सुबक छपाई करणारे श्री. डिखोळकर यांचीहि मी अत्यंत आभारी आहे.

आपली

नागपूर. सौ. शकुंतला पडोळे

ता. ५-२-५८. प्रकाशिका

अनुक्रम ........ मि. ........
ग्रंथ ........ क्रों. कि ........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क. 1058
(स्थळ प्रत)

# भुलायांचा उत्सव कसा साजरा करावा!

भुलायांचा उत्सव भाद्रपद पौर्णिमेपासून तो अश्वीन पौर्णिमेपर्यंत १ महिना साजरा करण्याची आपल्याकडे पद्धत रूढ झाली आहे. या उत्सवाचें चांगलें मूळ स्वरुप जाऊन त्याला ओंगळ स्वरुप प्राप्त झालें आहे, आणि म्हणूनच परि-स्थितीनुरुप अवश्य तो बदल केला पाहिजे असें आमचें स्पष्ट मत आहे.

भुलायांचा उत्सव म्हणजे शंकर पार्वतीचा उत्सव. भाद्रपद पौर्णिमेला शंकर पार्वतीच्या मातीच्या प्रतिमांची स्थापना करतात. रोज पूजा खिरापत व खेळ–टिपरीवर दोर धरुन गाणीं म्हणणें असा कार्यक्रम करून कोजागिरीला अनेक पदार्थांचा नैवेद्य दाखवून समाप्ती करतात. मुली जीं पदें किंवा गाणीं रोज म्हणतात त्यांत चांगला अर्थही नाही व ताल–सूर–लय यांचाही मेळ नाही. सासरची निंदा, माहेरची स्तुति, नणंदाभावजयांचें भांडण, वगैरे निंद्य नी अनुचित प्रकार बाल मनावर वाईट परिणाम करतात. ज्या सासरी मुलींना जन्म काढायचा त्या सासरच्या माणसांच्या स्वभावाचें विकृत चित्र रेखाटणें केव्हांही अनिष्टच आहे. त्यापेक्षा असलीं बालमनावर वाईट परिणाम करणारीं गीतें काढून टाकून भुलाईच्या उत्सवाला योग्य अशीं गाणीं घालून तालबद्ध म्हणायला शिकविल्यानें मुलींचा फायदाच होईल. विनोद, बालपणच्या मौजा, देवीचें वर्णन, मागणी, विनवणी, प्रार्थना

[library stamp]

व आरती असें याचें स्वरूप ठेवावे म्हणजे संयुक्तिक दिसेल. बहुतेक मुली ' भुलाबाई बाळंतीण १ ला दिवस तो ३० वा दिवस हें गाणें नेहमी म्हणतात. गणेशोत्सव, शारदोत्सव वगैरे उत्सवांत असलें गाणें कुठेंच म्हटलें जात नसतांना याच उत्स- वांत हे कोणी घातलें असावें हें समजत नाही. या वंशपरंपरा- गत रूढ पद्धतीचा अवलंब केल्याने कोणताच चांगला हेतू या उत्सवांतून निघत नाही. मुलींचा बौद्धीक विकास किंवा शारि- रीक विकास यांत साधत नाही. संघटीतरीत्या कार्य करण्याची मुलींना संवय लागते, असेंही नाही. मुलीमुलींचें आपआपसांत फारसें पटत नाही. इतिकर्तव्यता कशांत वाटत असेल तर ती खाऊ झाकून आणून मुलींना ओळखायला लावण्यांत ! हा एक विनोदाचा व गमतीचा प्रकार मुलींच्या दृष्टीने चांगला आहे. पण तो प्रकार म्हणजे काहीं उत्सवाचा हेतू नव्हे. प्रत्ये- कीच्या घरीं रोज सर्व गाणीं म्हणून मुलीही इतक्या थकतात कीं त्या घरीं आल्यावर कित्येक वेळां न जेवतांच झोपतात. व कोजागिरीच्या दिवशीं तर अनेक पदार्थ प्रत्येकीच्या घरीं खाल्यानें शेवटीं अजीर्ण होतें. हा अनर्थ टाळण्याकरितां योग्य वाटले ते विचार आम्ही खाली लिहीत आहोंत, याचा भगिनींनी अवलंब करून ही नवी पद्धत मुलींना शिकवावी.

या पद्धतीने मुलींचा बौद्धीक व शारिरीक विकास होऊन राग, लोभ, द्वेष, मत्सरादि दुर्गुणांना मुरड घालून, प्रसंगी नमते घेऊन, त्यांची संघटीतरीत्या कार्य करण्याची शक्ति वाढेल.

## उत्सवाचें स्वरुप कसें असावें

हा उत्सव किती दिवसांचा ठेवावा याबाबत मतैक्य होत नसल्याने आम्ही खालील तोड सुचविली आहे. उत्सवाच्या आधी गांवांतील, पेठेंतील, मोहल्यांतील वा आळीतील स्त्रिया व मुली यांची एक बैठक कार्यकर्त्या भगिनींनी घ्यावी व सर्वानुमतें हा उत्सव किती दिवस ठेवायचा तें ठरवून घ्यावें. प्रत्येकाच्या घरी भुलाया न बसवता एकेका पेठेंत वा मोहल्यांत सार्वजनिक गणेशोत्सवाप्रमाणें एकत्र बसवाव्या यांत स्त्रियांनी आळीपाळीने देखरेखीचें काम वाटून घ्यावें. एक किंवा दोन घरच्या मुलींकड़े आळीपाळीने पूजासाहित्य, हार व खिरापत आणण्याचें सोपवावें. साधारण जाणत्या मुलीकडून खिरापत करून घ्यावी म्हणजे त्यांनाहि पदार्थ करता येतात व आणण केलेला पदार्थ सर्वांना ओळखायला लावण्यांत व देण्यांत अपूर्व आनंद वाटतो.

सोबतच्या पुस्तकांत दिल्याप्रमाणे नवीन चांगलीं लय-बद्ध पदें टिपरीच्या ठेक्यावर म्हणावयास शिकवावीत. सासर, माहेर, निंदा-स्तुती वगैरे गोष्टी कटाक्षाने टाळाव्यात. १।२ वर्षं मेहनत घेऊन नवीन गाणीं शिकवलीं कीं त्या आपो-आप दरवर्षी म्हणूं लागतील. याशिवाय उत्साही भगिनींनी निरनिराळे कार्यक्रम आंखून ते मुलीकडून करवून घ्यावेत.

## मनोरंजनाचे विविध कार्यक्रम

रोज तीच तीच कंटाळवाणीं गाणीं म्हणण्यापेक्षा मधून मधून कांहीं मनोरंजक कार्यक्रम असावा. भावगीतें, छोटी भाषणें-चरित्रपर, वर्णनपर अशीं व्याख्यानें, चांगले चांगले

उतारे पाठ म्हणून दाखविणें. उघाड असेल त्या दिवशी निरनिराळे खेळ किंवा स्पर्धा ठेवाव्यात. कधी नकला, कधी पत्त्यांचा अभिनव खेळ असा मनोरंजनाचा कार्यक्रम मुलींचा आनंद वाढ़वील. जाड पृष्ठाचे पत्त्याच्या आकाराचे तुकडे कापावे. त्यावर निरनिराळया मुलीकडून काढता येतील अशा क्रिया लिहाव्यात. गोलाकार मुलींना बसवून ते सर्व पत्रे मधोमध्य पालथे ठेवावे. पाळीपाळीनें एकेकीने पत्ता उचलावा. पत्त्यांत लिहिल्याप्रमाणें क्रिया करून दाखवावी. उदा.:– चार नमस्कार घाला, लंगडीने एक चक्कर करा. या शारिरीक क्रिया करुन दाखविणें, कोंबडयासारखा आवाज काढ़ा, मनाचा १ श्लोक म्हणा, केळयाची कोशिंबीर कशी कराल ? संत तुकाराम, शिवाजी हे कोण होऊन गेले ! अशा तऱ्हेच्या नाना प्रकारच्या क्रिया करून दाखविण्याने मुलींना गम्मत वाटून ज्ञान वाढविण्याचीही जिज्ञासा उत्पन्न होईल.

कधी कधी भगिनींनी स्वतः काहीं कार्यक्रम मुलींच्या करमणुकीकरता करावेत किंवा भाषणाद्वारें त्यांना उपयुक्त माहिती द्यावी. उभा खो खो वगैरे सारखे जमल्यास खेळ शिकवावें व शेवटच्या दिवशी याचें सर्वांना प्रात्यक्षिक दाखवावें.

शेवटच्या दिवशीं कोजागिरीला चांदण्यांत वा आंत दिवाणखान्यांत दिव्यांची रोषनाई व आरास करून वसंतगौरीप्रमाणें भुलायांची सजावट करावी. सर्वांना पुरेल असा प्रत्येकीने एकेक खाद्यपदार्थ आणावा. मुलींच्याकडून गाणीं म्हणवून घ्यावीं. करमणूकीचा कार्यक्रम व खेळ वगैरे झाल्यावर नैवेद्य

व आरती करावी व आणलेल्या पदार्थांचे नीट वाटप करून मुलीचें जेवण करावें. व नंतर आपआपल्या घरी जावें.

जागेच्या दृष्टीने महिला मंडळांत भुलाया मांडल्यास व सभासद भगिनींनी सर्व जबाबदारी आळीपाळीने अंगावर घेतल्यास हा उत्सव उत्तम रीतीने पार पडेल. तसेंच शक्य तो हा उत्सव एक महिन्याचा न करता दहा किंवा पंधरा दिवसाचा केल्यास कंटाळवाणा होणार नाही. परंतु ही पद्धत सर्वांना न रुचल्यास वसंतगौरीप्रमाणे प्रत्येकीने एक दिवस आपल्या घरी भुलाया साजऱ्या कराव्या.

महिला मंडळासारख्या स्त्रीसंस्थांनी हें कार्य हातीं घेतल्यास संस्थेचा नांवलौकिक वाढून समाजकार्याचें श्रेयहि मिळेल. ज्या गांवाला या वरील पैकी जी पद्धत आवडेल व सोयीस्कर होईल, त्याप्रमाणें हा उत्सव साजरा करावा.

## गीत १ लें

( ऐलमा पैलमा गणेश देवाच्या चालीवर )

आधी वंदन गणेशदेवा । आमचा खेळ होऊं दे,
करुं तुझी सेवा ।। धृ ।।

आमचा खेळ मांडिला डोंगराबरी ।
भुलोबा भुलाई बसली त्यावरी ।
अुत्सव करितो महिनाभरी ।

सर्व मिळोनी या ग या । टिपऱ्या हाती घेउनिया ।
नाचूं गाऊं फेर धरूं । भुलाईची पूजा करूं ।
तऱ्हेतऱ्हेची पुष्पें वाहूं । पक्वान्नें नैवेद्य आणूं ।
ऐसा खेळ खेळायाला । विघ्नेशा मति द्या आम्हांला ।
कर जोडुनी विनवी तुम्हाला । सौख्य निरंतर लाभो सकलां ।।
आधी वंदन गणेशदेवा ।। १ ।।

## गीत २ रें

( चाल:- कुणी माझी आंधळीचीं विकत घ्या फुलें )

जमूं सगळ्या एकत्रित गीत गाऊं या । गडे
गीत गाऊं या ।।

भक्तीने देवी भुलाईस आळवुं या । गडे
देवी आळवुं या ।। धृ० ।।

देवी पार्वती
शंकराप्रती

मागूं सन्मती

कर जोडुनी धैर्य, बलां सकल मागुं या । गडे गीत गाऊं या ।।१।।

ही बुद्धिदेवता

ही शक्तिदेवता

ही राष्ट्रदेवता

ऐक्य सदा नांदू दे हेंच मागुं या । गडे गीत गाऊं या ।। २ ।।

धर्म भक्तीची

राष्ट्रभक्तीची

प्रेरणा सदैव वसो हृदयीं आमुच्या गडे । हेंच मागुं या ।।

जमु सगळया एकत्रित गीत गाऊं या । गडे । गीत गाऊं या ।।

भक्तीने देवी भुलाईस आळवूं या । गडे गीत गाऊं या ।। ३ ।।

सौ. सुशीला दाणी, बुलढाणा

गीत ३ रें

## भुलाबाई झाली नवनवरी

भुलाबाई आली घरोघरी–

घरोघरीं झाली नवनवरी ।

लग्नाला बसली पाटावरी ।।१।।

भुलाबाई भुलाबाई आवडती

आवडती बाई सगळयांची

झिम्मा–फुगडी रिमझिमती ।।२।।

भुलाबाई आल्या नटून थटुन

नटून थटून बाई नटून थटून ।

फुलां–फळांची लुट घेउन ।।३।।

भुलाबाई भुलाबाई लवकर या
लवकर या बाई अंगणी या ।
घडिभर हासू खेळूं या ॥४॥

—कु. कमल घावडे, नागपूर

## गीत ४ थें

( चला चला रे शाळेला । गुरुजीपाशी शिकण्याला या चालीवर )

चला चसा ग सर्वजणी । टिपऱ्या हातीं घेवोनी ।
फेर धरुनी गाऊं या । तालावरती नाचूं या ।
भांडण तंटा रुसवा सारा
विसरुनी जाउ द्वेष मत्सरा
दुर्गुणांना देऊं न थारा
सद्‌गुण अंगी आणूं या । विविध खेळ मग खेळुं या ॥
चला चला ग सर्वजणी । टिपऱ्या हातीं घेवोनी ॥ १ ॥

—सौ. तारा सावंगीकर, बुलढाणा

## गीत ५ वें

( चाल:– बाबा गेले की पैठणाला, या चालीवर )

आली पार्वती माहेराला कीं माहेराला ।
वाजत गाजत आणूं तिला कीं आणूं तिला ॥धृ०॥
घालूं तिला मंगल स्नान
नेसवूं या पैठणी छान
चोळी जरीची शिवूं तिला कीं शिवूं चला ॥
आली पार्वती माहेराला कीं माहेराला ॥ १ ॥

रंगीत पाट मांडू तिला ।
चांदीचं ताट ठेवा, चला ।।
पंचपक्वान्नें वाढायला कीं वाढायला ।।
आली पार्वती ।।२।।

बासुंदी अन् केली पुरी
श्रीखंड हें आणलं जरी
पोळी पुरणाची वाढूं तिला कीं वाढूं तिला ।।
आली पार्वती ।।३।।

बुंदीचे हे लाडू करा
करंज्या अन् वाढूं शिरा
घीवर मांडे करूं चला कीं करूं चला ।।
आली पार्वती ।।४।।

जिलबी करून आणा कोणी
साखरभात वाढा झणीं
गुलाबजंबूहि वाढा तिला कीं वाढा तिला ।।
आली पार्वती ।।५।।

चला सख्यांनो फेर धरा
भुलाबाईचें कौतुक करा
गाणीं गावून रिझवूं हिला । कीं रिझवूं हिला ।
खिरापती घ्या वाटूं चला कीं वाटूं चला ।।
आली पार्वती माहेराला ।।६।।

—सौ. उषा लिमये, नागपूर

## गीत ६ वें

( चाल:- झोक्यांना घेऊं या )

आल्या या भुलाया बाई । आल्या या भुलाया ।
आणा ग बाई पंचारती यांना ग ओवाळाया ।।धृ०।।

सुवासीक तीं तेलें आणा
वासाचा हा साबण त्यांना
उन्हं उन्हं हें पाणी घेऊनी आंघोळी घालूं या ।।
आल्या या ।।१।।

सोन्याची ती आणा फणी
घालूं भुलायांची वेणी
गुलाब, शेवंतीचीं पुष्पें वेणीमध्ये घालूं या ग ।
आल्या या ।।२।।

नेसवूं या चंदेरी शालू
जरतारी मग चोळी घालूं
दागदागिने नवनवतीचे अंगावर लेववूं या ।
आल्या या भुलाया ।।३।।

चांदीचा तो आणा पाट
सोनियाचे ठेवा ताट
पंचपक्वान्नांनी त्यांना जेवावया घालूं या ।।
आल्या या भुलाया ।।४।।

मखरामाजीं बसवुं त्यांना
बोलावूं या सर्व सख्यांना

गाणीं गाऊं आनंदाने फेर धरुनी नाचूं या ।
आल्या या भुलाया ।।५।।
-सौ. उषा लिमये, नागपूर

## गीत ७ वें

(टिपरी खेळूं या ग) या चालीवर

टिपरी खेळूं या ग । टिपरी खेळूं या ।
भुलाईची गाणीं गाऊं । हासूं नाचूं या ।। ग ।।धृ०।।
हिरवागार हा डोंगर
मांडू चवरंग त्यावर
खाली सरीतेचें नीर । धांवे खेळाया ।। टिपरी ।।१।।
चवरंगी बसवूं देवीला
वस्त्रें विविध हीं तिला
हार फुलांचे गुंफुनी सजवूं देवीला ग ।। टिपरी ।।२।।
घरोघरीच्या बालिका
जमूं एकत्र सारिका
सायंकाळच्या वेळेला । फेर धरूं या ग ।। टिपरी ।।३।।
रोज निराळा पदार्थ
भुलाईच्या नैवेद्यार्थ
वाटू प्रसाद सकलां । मौज लुटूं या ग ।। टिपरी ।।४।।
टिपरी खेळूं या ग । टिपरी खेळूं या ।
भुलाईची गाणीं गाऊं । फेर धरूं या ग ।। टिपरी ।।४।।
-सौ. इंदुमती देशपांडे, बुलढाणा

## गीत ८ वें

('वन्सं वन्सं मला मूळ आलं । आता धाडा माहेरा') या चालीवर

दादा आला मला म्हणाला 'चल ग ताई घराला । घराला ।।
'कशी रे येऊं दादा मी तरी मामंजीचा लळा मला ।
लळा मला ।।१।।
भाऊ आला मला म्हणाला 'चल ग ताई माहेरा । माहेरा ।
आनंदे मी सुखें नांदते कमतरता नच इथे जरा ।
मी नाही येत माहेरा ।।२।।
आई आली मला म्हणाली चल ग बाळे गांवाला । गांवाला ।
भाग्यवान मी खरीच आई, प्रेमळ सासू मिळे मला ।
मी नाही येत माहेरा ।।३।।
माई आली मला म्हणाली चल ग ताई खेळायला । खेळायला ।
वन्सं भाउजी गोड सवंगडी रोज खेळतो सांजेला । सांजेला ।।४।।
बाबा आले मला म्हणाले मीच आलों तुज न्यायाला । न्यायाला ।
हपिसामधुनी स्वारी न आली, परवाना ना काढियला ।
मी काढियला ।।५।।
दादा आला पुन्हा म्हणाला चल ग ताई दिवाळीला । दिवाळीला ।
घरचें लक्ष्मीपूजन होता येईन नक्की बीजेला । बीजेला ।।६।।
भाउबिजेचा सण परवाला आनंद होईल सकलाला ।।
सासर माझे माहेरासम कमतरता नच इथे मला ।।७।।
गृहिणीचें कर्तव्य करोनी मग मी येईन माहेरा । माहेरा ।।
ताई आली भोद जाहला आनंदा तोटा नुरला ।
आनंद झाला सकलांला ।।८।।

—सौ. शकुंतला मंगरुळकर, नागपूर

## गीत ९ वें

(चांदण्यांत खेळतांना म्हणण्याजोगे)

(चाल:- शाम मुरारी रास खेळुं या) बँडच्या चालीवर सुद्धा चालते.

सृष्टीसतीने अंथरला । अंगणांत चांदण्याचा सुंदर झेला ।
बाई सुंदर झेला ।।धृ०।।
नभीच्या ग अंगणांत आल्या तारका ।
भूवरती या जमल्या सर्व बालिका ।
खेळ विविध खेळता मोद जाहला । बाई । मोद जाहला ।।
सृष्टीसतीने अंथरला । अंगणांत चांदण्याचा सुंदर झेला ।।१।।
लाजत डोलत आली एक चांदणी ।
काळया मेघाच्या आडोशी बसे लपूनी ।
शोधुनीया तिला सर्वजणी दमल्या । बाई साऱ्या दमल्या ।।२।।
खोखो, हुतुतू झिम्याचा खेळ संपला ।
उभा खोखो लपंडाव, पिंगा घातला ।
फुगडयांचा खेळ होता फेर धरला । बाई फेर धरला ।।३।।
भुलाईस अर्पूनीया नैवेद्य नाना ।
पंचारती ओवाळुनी करूं नमना ।
खाऊं वाटूं, प्रेमभरें जाऊं घराला । साऱ्या जाऊं घराला ।
सृष्टी सतीने अंथरला । अंगणांत चांदण्याचा सुंदर झेला ।।४।।

सौ. सुशीला दाणी, बुलढाणा

## गीत १० वें

(चाल:- नणंदा भावजया दोघीजणी)

नणंद भावजय दोघीजणी । खेळत होत्या छप्पापाणी ।।
सर्वजणी उत्सुक झाल्या । आगीन पासोडा खेळायाला ।।
मैत्रिणी घेतल्या वाटून । चादर आल्या घेऊन ।।
खेळता खेळता गम्मत झाली । दादाची स्वारी तेथे आली ।।
दादा लपला चादरी खाली । वहिनी ओळखायाला आली ।
'कोंबडया कोंबडया भाग दें । आंतला गडी ओळखू दे ।
वहिनीला आवाज ओळखेना । आम्हाला हसूं आवरेना ।
अखेर वहिनी हारली । खसकन चादर ओढली ।
दादाला पाहून लाजली । घरांत लपून बसली ।
आम्ही शोधून आणले । नांव घ्यायला लावलें ।।१।।

—सौ. सुशीला दाणी, बुलढाणा.

## गीत ११ वें

### भुलाईची आरती

जयदेवी जयदेवी जय भुलाबाई । ओवाळूं आरती
सद्भावें तुज ही ।। जयदेवी जयदेवी ।।धृ०।।
सान आम्ही बाला, अल्पमती आम्ही ।
शक्ती बुद्धी देई आम्हा लागुनी ।
तारक तूं जगताची आदिमाया तूंची ।
आम्ही कन्या तुझिया (तुझ्या) माता तूं आमुची ।।
जयदेवी जयदेवी ।।१।।

दा. क. १०६९

अपराधासी क्षमा आम्हां करावी ।
कर जोडुनी विनवी तुजला ही देवी ।
द्वेष-मत्सरादी दुर्गुण टाकून ।
सद्‌गुण पुष्पें घेऊं अवघी वेंचून ।
धर्मराष्ट्र-कार्य कराया स्फूर्ती ।
द्यावी, कृपा असो तुझी आम्हांवरती ।
जयदेवी जयदेवी जय भुलाबाई ।
ओवाळूं आरती सद्‌भावें तुजही ।।२।।

-सौ. सुशीला दाणी, बुलढाणा

## गीत १२ वें

### भुलाईचें चांदण्यांतील गाणें २ रें

(लाडक्या राणीला लागले डोहाळे) या चालीवर

आकाशीं सतेज चंद्रमा आला । भुलाया खेळाया जमूं चला ।।धृ०।।
मांडू या भुलाया चांदण अंगणी ।
सजवा मखर पुष्पांनी कोणी ।। आकाशीं सतेज ।।१।।
जाईची जुईची शुभ्रही फुलें । शुभ्र हें पातळ देवीला खुले ।।२।।
देवीचें स्वागत सृष्टी ही सारी । हासत आली खेळायाला ।।
आकाशीं ।।३।।
मंजूळ मंजूळ निर्झर वाहत । मंजूळ घेई आलापाला ।।४।।
प्रशांत समयीं तरुंच्या शाखांचा । वायूच्या लहरी हालविती
झोला ।।५।।

नूपुर पैंजण पायीं बांधूनी । स्वर्गांगना आली खेळायाला ।।६।।
नैवेद्य दाखवूं पदार्थ नाना । ओवाळूं आरती करूं नमना ।।७।।
शक्ती बुद्धी देई ऐक्य नांदू दे । राष्ट्राच्या कामीं देह पडूं दे ।।
सान बालिकांची हीच विनंती । देवी या प्रतिवर्षी उत्सवाला ।।८।।

—सौ. सुशीला दाणी, बुलढाणा

## गीत १३ वें

## आमुचा चिमुकला संसार

चिमुकला संसार—आमुचा चिमुकला संसार ।।धृ०।।
नवजगताचा—नवलाईचा ।
लटूपटूंचा-सुख स्वप्नांचा ।
भावी अमुच्या—नव जीवनाचा ।
अवतरला साकार—आमुचा—चिमुकला संसार ।।१।।

भावी अमुच्या—जीवनामधलीं ।
भुलबा—भुलबी—बाळें अपुलीं ।
सुखस्वप्नांचीं—मूर्ति सानुली ।
केली ही तय्यार—आमुचा—चिमुकला संसार ।।२।।

भुलबयांचा सण—स्फूर्ति देवो ।
जीवन अमुचें—सुखमय होवो ।
स्वप्न मनीचें—जीवनी उमलो ।
हाच तयांतील सार—आमुचा—चिमुकला संसार ।।३।।

—कु. गंगुताई लामट, नागपूर

## श्लोक (प्रार्थना)

भुलोजी तुम्ही थोर कैलासनाथ ।
कृपादृष्टी व्हावी, पदीं लीन, वान ।
आम्ही मागतो शक्ति बुद्धी गुणांला ।
नमस्कार कैलासनाथ तुम्हाला ।।१।।
वसो राष्ट्रभक्ती सदा अंतरांत ।
तनू ही पडो देश धर्मा हितार्थ ।
सदा शील संवर्धनी लक्ष ठेवूं ।
भुलाई तुझें नित्य गुणगान गाऊं ।।२।।

–सौ. इंदुमती देशपांडे, बुलढाणा

०————————०

– समाप्त –

०————————०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०९
ग्रंथ ... १८७८ ...

## बालवाचनालयें व शालेय वाचनालयांना खास सवलत

खालील पुस्तकांपैकीं १० रुपयांचेवर पुस्तकें घेणारांना शे. २५ कमिशन, ६ ते ९ रुपयापर्यंत पुस्तकें घेणारास फ्री पोस्टेज दिलें जाईल.

**वाचनालयांसाठी कथा, कादंबरी, नाटक–नाटिका, चरित्र, निबंध आदि विषयावरील शे. २५ कमिशनचीं पुस्तकें**

## आमचीं संग्राह्य पुस्तकें

१ विचारें निर्दोषी पोर (काद) ॥
२ भुलायाचीं गीतें ।–
३ साने गुरुजींची हाक (नाटिका) ॥
४ परिक्षेंची पूर्वतयारी ,, ॥
५ संभाविताचा काळाबाजार १॥
६ उखाणें व कोडीं ॥
७ आनंदी आनंद गडे–कथा ॥
८ स० पैशाचा खेळ नाटिका ॥
९ संध्याराणी ॥
१० चांदण्या ॥
११ बंड्या वानर बिलंदर कोल्हा ॥
१२ झाकली मूठ (नाटिका) ॥
१३ इंडियन अॅडमिनिस्ट्रेशन १
१४ डॉ. आंबेडकर चरित्र १
१५ संत तुकडोजी चरित्र १॥
१६ गोंडवाणी लोककथा ॥।
१७ प्रारंभिक हिंदी शिक्षक ।॥
१८ प्रकाशकाकडे १
१९ लघुकथांचें तंत्र, मंत्र १॥
२० परित्यक्ता (कादंबरी) २॥
२१ प्रारंभ (नवकाव्याची झलक) ३॥
२२ मराठी ग्रंथालयाचा इ. ५
२३ धन्यवाद (नाटिका) ॥
२४ विसर मोळा ,, ॥
२५ बायका ह्या अशाच-नाटय ।॥
२६ वसईचें कारस्थान १॥
२७ सुनहरा नगर (कथा) ॥
२८ चिंचा आणि बोरें १
२९ व्यवहार सोबती १
३० भारतीय थोर पुरुष भाग १, २, ३, प्रत्येकी ३ रु.

## आमचीं शालेय पुस्तकें

१ आमचे राष्ट्रीय कित्ते १, २ वर्ग २, ३ व ४ साठीं मूल्य प्र. ।
२ राष्ट्रीय वाचनमाला १, २, ३ वर्ग २, ३ व ४ साठीं ,, ।, ।–, ।=
३ शालेय चित्रकला १ ते ४ वर्ग ५, ६, ७ व ८ साठीं ,, ॥
४ क्रांतिवीरांचीं स्फूर्ति चरित्रें भाग १व२ वर्ग ५व६ साठीं ,, ।= व ॥
५ मराठी भाषा बोध वर्ग ९, १०, ११ ,, १॥
६ सुलभ मोडी शिक्षक भाग १,२,३,४ वर्ग५,६,७व८ साठीं ,, ।=
७ आदर्श हिंदी शिक्षक भाग १ ते ४ वर्ग ५,६,७व८ साठीं ,, ।=, ॥,॥,॥=

पूजा प्रकाशन, धनतोली, नागपूर.


१०६००

[illegible] प्रेस [illegible]

REFBK-0010604
REFBK-0010604